जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAY 2025

सकाळ

# कुलगुरू शोध समितीसाठी प्रा. सुहास जोशी यांची स्वीकृती

## अधिकार मंडळांनी सुचविलेले नाव

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू शोध समितीसाठी आयआयटी इंदूरचे संचालक प्रा. सुहास जोशी यांची स्वीकृती मिळाली आहे. त्यानुसार विद्यापीठाने पुढील कार्यवाहीसाठी त्यांचे नाव कुलपती कार्यालयाला पाठविले आहे.

विद्यमान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कालावधी सहा ऑक्टोबर रोजी संपणार आहे. त्यापूर्वी नवीन कुलगुरू निवडीसाठीची प्रक्रिया कुलपती कार्यालयाने सुरू केली आहे. कुलगुरू निवडीसाठी कुलपती कार्यालयास योग्य नावाची शिफारस करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम अकरा (तीन) नुसार कुलगुरू शोध समितीवर विद्यापीठाने एका व्यक्तीचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करावयाचे असते. त्यासाठी विद्यापीठ कायद्यानुसार या समितीवर व्यवस्थापन परिषद आणि विद्या परिषद या अधिकार मंडळांनी एकत्रित एका सदस्याचे नामनिर्देशन करून द्यावयाचे आहे. त्याबाबत कुलपती कार्यालयाने विद्यापीठाला २० मार्च रोजी पत्राव्दारे निर्देश दिले होते. त्यानुसार व्यवस्थापन आणि विद्या परिषदेची बैठक पाच मे रोजी झाली. त्यामध्ये तीन व्यक्तींच्या नावांची निवड करण्यात आली. त्यात आयआयटी इंदूरचे संचालक प्रा. सुहास जोशी, बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स पिलानीचे कुलगुरू प्रा. व्ही. रामगोपाल राव आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी रोपरचे संचालक राजीव आहुजा यांच्या नावाचा समावेश आहे.

या तिघांपैकी प्रा. जोशी यांच्या नावाची पहिल्या क्रमांकाची, तर प्रा. राव आणि आहुजा यांच्या नावाची अनुक्रमे व्दितीय आणि तृतीय क्रमांकावर शिफारस केली. या व्यक्तींना अधिकार मंडळांनी दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार विद्यापीठाकडून पहिल्यांदा प्रा.जोशी यांना पत्र पाठविले. त्यांनी स्वीकृत दिली. त्यानुसार त्यांचे नाव कुलगुरू शोध समितीचे सदस्य म्हणून अधिकार मंडळांच्या मान्यतेने कुलपती कार्यालयाला पाठविण्यात आले आहे.

### पुढील प्रक्रिया होणार कुलपती कार्यालयाकडून

■ प्रा. जोशी यांनी समिती सदस्य म्हणून काम करण्यास स्वीकृती दिल्याने शोध समितीच्या स्थापनेबाबतच्या पुढील कार्यवाहीला गती मिळणार आहे. या समितीची स्थापना, नोडल ऑफिसरची नियुक्ती, अर्ज स्वीकारणे, अर्जांची छाननी, आदी स्वरूपातील प्रक्रिया आता कुलपती कार्यालयाच्या माध्यमातून होणार आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAY 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून २२२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेसाठी ४७ हजार ८१३ विद्यार्थी उपस्थित होते. आजअखेर २२२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी बीए, बीएस्सी, एबीए, बीई, डिप्लोमा इन सेरीकल्चर, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन रूरल डेव्हलपमेंट, पीजी डिप्लोमा इन गांधीयन स्टडीज आदी ५५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १८३ केंद्रावर सुरळीतपणे झाल्या. दि. २३ रोजी बीडीएस, बी.व्होक ग्राफिक्स, बी.कॉम आयटी आदी ८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAY

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून बीसीए भाग-२ ची प्रात्यक्षिक परीक्षा स्थगित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संलग्न कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयातील बीसीए भाग दोन, सेमीस्टर ३ व ४ या अभ्यासक्रमांची प्रात्यक्षिक परीक्षा स्थगित करण्यात आली आहे. सध्या विद्यापीठाच्या वतीने कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. उन्हाळी सत्र २०२५ मधील बीसीए भाग ३, सेमीस्टर ५ व ६ चे मध्यवर्ती मूल्यमापनाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे काही प्रात्यक्षिक परीक्षा स्थगित केल्या आहेत. याबाबतचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAY 2025
लोकमत

# बीसीए भाग दोनची 'प्रात्यक्षिक' स्थगित

**कोल्हापूर :** उन्हाळी सत्र २०२५ मधील बीसीए भाग ३, सेमिस्टर ५ व ६ चे मध्यवर्ती मूल्यमापनाचे काम अद्याप पूर्ण न झाल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील बीसीए भाग दोन, सेमिस्टर ३ व ४ या अभ्यासक्रमांची प्रात्यक्षिक परीक्षा स्थगित करण्यात आली आहे. याचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पत्रकाद्वारे कळवले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAY 2025

पुढारी

# शिक्षक अभियोग्यता चाचणी, शिवाजी विद्यापीठ, मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा एकाच कालावधीतच

**कोल्हापूर :** शिक्षक अभियोग्यता चाचणी व शिवाजी विद्यापीठ तसेच मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा एकाच कालावधीतच आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्या परीक्षेला बसावे? असा गोंधळ निर्माण झाला आहे. सध्या शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात सुरू आहेत. मुक्त विद्यापीठाच्यादेखील परीक्षा सुरू आहेत. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरतीकरिता शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टेट) परीक्षेचे ऑनलाईन पद्धतीने २४ मे ते ५ जून या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. अनेक परीक्षा एकाचवेळी आल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. राज्य सरकारने विद्यार्थीहितास्तव परीक्षा तारखांमध्ये बदल करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांमधून होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAY 2025
लोकमत

# डॉ. विजय ककडे यांची तज्ज्ञ निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्रा.



डॉ. विजय ककडे यांची बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजच्या वतीने (बीएसई) अर्थसाक्षरतेसाठी तज्ज्ञ म्हणून निवड करण्यात आली. बीएसईच्या वतीने विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी अर्थसाक्षरतेची माहिती दिली जाते. डॉ.ककडे यांच्या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.